(१)

१७
१९

परिपत्रक

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – 18, कामगार कल्याण विभाग
कमांक – काक/3/कावि/169/2013
दिनांक – १९ मार्च 2013

**विषय :–कामगार कायदयाची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत...**

2/–पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत ठेकेदारी पध्दतीने कामगार नेमले जातात. अथवा विविध प्रकारची कामे ठेकेदारी पध्दतीने केली जातात. ठेकेदारी पध्दतीने नेमलेल्या कामगारांना व ठेकेदारी पध्दतीने दिलेल्या कामावरील कामगारांना विविध कामगार कायदे लागू होतात. या कायदयांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ज्या विभागाने ठेका दिलेला आहे त्या विभागाची आहे. तथापि असे निदर्शनास आले आहे की, कामगार कायदयांची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. त्याच प्रमाणे कंत्राटदारांनी नेमलेल्या कामगारांना किमान वेतन कायदयातील तरतुदीनुसार अनुषंगीक सुविधा व किमान वेतन दिले जात नसल्याच्या तकारी वारंवार येत आहेत. कामगार कायदयाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी प्रिन्सीपल एम्प्लायर म्हणून महानगरपालिकेची आहे. त्यामुळे ज्या विभागाकडून कंत्राटी कामगार नेमण्याचे ठेके दिलेले आहेत त्या विभागाने ठेकेदाराला बिलाची अदायगी करतांना कंत्राटदाराने नेमलेल्या कामगारांना किमान वेतनाप्रमाणे वेतन देत आहे किंवा कसे? त्याचप्रमाणे त्यांना अनुषंगीक सुविधा दिल्या जात आहेत काय? याबाबत शहनिशा करून ठेकेदारांकडून कागदपत्रांची मागणी करणे आवश्यक आहे. तथापि संबधीत विभागाकडून नेमलेल्या कंत्राटदारांकडून आवश्यक कागदपत्रांची मागणी न करताच बिले अदा केली असल्याची बाब समोर आली आहे. सबब महानगरपालिकेतील सर्वच विभागांनी खालील मार्गदर्शक तत्वानुसार व कायदयातील तरतुदींनुसार तपासणी करून व शहनिशा केल्यानंतरच कंत्राटदारांना देयके अदा करावीत.

1. नियुक्त करण्यात आलेल्या कामगारांना किमान वेतन दराने वेतन अदा केले जात असल्याबाबत आपल्या विभागाकडून योग्य त्या कागदपत्राच्या पुरव्यासह खात्री करून घेण्यात यावी.
2. कंत्राटदारामार्फत नियुक्त केलेल्या कामगारांचे वेतन व त्या अनुषंगींक इतर सर्व भत्ते रोख स्वरूपात अदा न करता संबधीत कंत्राटी कामगारांच्या नावांने असलेल्या बॅक खात्यात जमा करण्यात यावे किंवा Account payee Cross cheque द्वारे (रेखांकित चेकद्वारे) अदा करावेत.

3. संबधीत ठेकेदाराने भविष्य निर्वाह निधी.,राज्य कामगार विमा, कामगार कल्याण निधी, संबधीत शासकिय संस्थेकडे कामगाराच्या नांवाच्या यादीसह भरलेबाबत खात्री करून पुढील महिन्याची देयके अदा करण्यात यावी.

4. ठेकेदारामार्फत किमान वेतन कायदयातील तरतुदीनुसार कामगारांस साप्ताहिक सुट्टी देणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे हजेरी कार्ड, पगार स्लिप दिल्याची खात्री करून घ्यावी.

5. नियुक्त कामगारांना leave with wages, Paid holiday, Uniform Washing Allwance, Convience allwance इत्यादी अदा केले असल्याबाबत विभागाकडून खात्री करून घ्यावी.

6. कंत्राटी कामगार कायदा 1970 कलम 12 अन्वये महानगरपालिकेने नियुक्त केलेले ठेकेदार/आस्थापनेमध्ये 20 किंवा 20 पेक्षा अधिक कामगार/सभासद काम करीत असतील तर अशा कंत्राटदारांने कामगार उप आयुक्त यांच्याकडून अनुज्ञप्ती (Contractor licence) घेणे बंधनकारक आहे. त्यामुळे 20 किंवा 20 पेक्षा अधिक कामगार असलेल्या कंत्राटदाराने उप आयुक्त यांच्याकडून अनुज्ञप्ती घेतली आहे किंवा कसे याची खात्री करूनच संबधीत शाखा प्रमुखांनी कंत्राटदारास बिलाची अदायगी करावी.

7. आपल्या विभागामार्फत ठेकेदारीपध्दतीने कामगारांची नेमणूक केल्यास त्या कामाचे आदेश,ठेकेदारांशी केलेल्या कराराची प्रत तसेच ठेकेदारीपध्दतीने दिलेल्या सर्व कामाच्या आदेशाच्या प्रती ( work order ) कामगार कल्याण विभागाकडे पाठविणेत याव्यात.

सबब, वरील प्रमाणे खात्री करून व कागदपत्रे प्रकरणी दाखल केल्यानंतरच कंत्राटदारांना बिले अदा करण्यात यावी. व ठेकेदारांनी नेमलेल्या कामगारांच्या तकारी राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी. यामध्ये हलगर्जीपणा अपेक्षित नाही. हलगर्जीपणा आढळून आल्यास संबधीत खातेप्रमुखांवर प्रशासकिय कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – 411 018

प्रतिलिपी :– – — ————————
————————————

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – 411 018